जा क्र 4066/2018

धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
दिनांक : 06 JUL 2018

विषय- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ च्या नियम २३ अंतर्गत अभिलेखाच्या प्रती देण्यासाठी व नियम २२ अंतर्गत अभिलेखाचे निरिक्षण देण्याकरिता कालमर्यादा निश्चित करण्याबाबत........

संदर्भ- मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अपील क्र. MHSICMV/२०१८/M/००१२१५ मधील दि.२६/०४/२०१८ रोजीचे आदेश.

**कार्यालयीन परिपत्रक क्रमांक 544........, दिनांक : 06/07/2018**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, वरील संदर्भीय आदेशानुसार सदर कार्यालयीन परिपत्रकाव्दारे धर्मादाय आयुक्तालयाच्या सर्व अधिनस्त जिल्हा कार्यालयांना निर्देशित करण्यांत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ च्या नियम २३ अंतर्गत कार्यालयीन आभिलेखाच्या प्रती देण्याकरिता कालमर्यादा खालीलप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येत आहे :-

१) उक्त नियमानुसार नक्कल प्रत प्राप्त होण्यास्तव, परिपूर्ण अर्ज कार्यालयात आवक झालेल्या दिनांकापासून कमाल १० दिवसांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून), उपलब्ध कागदपत्रांच्या नक्कल प्रती, अर्जदारास अथवा अर्जदाराने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस, त्यांनी सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत प्रतिपृष्ठ रु. ४ /- याप्रमाणे शुल्क भरणा केल्यानंतर देण्यात याव्यात.

२) जर ठराविक कागदपत्रांची नक्कल प्रत तात्काळ आवश्यक असेल तर, त्याबाबतचा परिपूर्ण अर्ज कार्यालयात आवक झालेल्या वेळेपासून उपलब्ध नक्कल प्रत ४८ तासांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून), अर्जदारास अथवा अर्जदाराने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस, त्यांनी प्रतिपृष्ठ रु. ७/-याप्रमाणे आगाऊ शुल्क सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत भरना केल्यानंतर, देण्यात यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ च्या नियम २२ अंतर्गत अभिलेखाचे निरिक्षण देण्याकरिता खालीलप्रमाणे कालमर्यादा विनिर्दिष्ट करण्यात येत आहेः-

प्रथम, अर्जदाराने नेमक्या कोणत्या न्यासाचे / त्यातील कोणत्या प्रकरणांचे ते निरिक्षण घेणार आहेत, त्याबाबतचा संपूर्ण तपशिल अर्जात नमूद करावा. असा परिपूर्ण अर्ज अर्जदाराने कार्यालयात दाखल केल्यानंतर, तो आवक करून, नोंदवहीत नोंद घ्यावी व अर्जदारास, कमाल १० दिवसांच्या आतील (सुट्टीचे दिवस वगळून) तारीख व वेळ दयावी व त्याची नोंद घेतल्याची अर्जदाराकडून नोंदवहीत स्वाक्षरी घ्यावी. अर्जदार निश्चित केलेल्या तारखेस न आल्यास, त्याचा अर्ज दप्तर दाखल करावा.

उक्त निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

**धर्मादाय सह आयुक्त,**
बृहन्मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / कोल्हापूर / लातूर / अमरावती .

**धर्मादाय उप आयुक्त,**
ठाणे / अहमदनगर / सांगली / सोलापूर / जळगांव /नांदेड / अकोला / बीड.

**सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / धुळे / सातारा / परभणी / उस्मानाबाद / जालना / वर्धा / यवतमाळ / बुलढाणा / चंद्रपुर / गडचिरोली / भंडारा / वाशिम / हिंगोली / नंदूरबार / गोंदिया.

अधिक्षक (आस्थापना शाखा), मुख्यालय.
अधिक्षक (संगणक शाखा), मुख्यालय.
अधिक्षक (अभिलेखा शाखा) मुख्यालय.